# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 27/12/2022 (मंगळवार) सकाळ

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. वेलतूर :– अंतर्गत २५ कि.मी अंतरावरील मौजा राजोला येथे दिनांक २६/१२/२०२२ चे १४.१५ वा. ते १४.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे क्र. १) हीतेश रामभाऊ राऊत, वय २९ वर्ष व आरोपी क्र. २) सुर्यकांत विनायक जंजाड, वय २७ वर्ष, रा. टाकळी पो. कळमना ता. कुही यांनी संगनमत करून फिर्यादीची मुलगी पिडीता साक्षी उमराव वैद्य हीने आरोपी क्र. १) शी लग्न करण्यास नकार दिल्याने एकतर्फी प्रेम असलेल्या आरोपी क्र. १) ने ''माझ्याशी लग्न केले नाही तर तुला जिवंत सोडणार नाही'' असे म्हणुन फिर्यादी नामे– उमराव दाजीबा वैद्य, वय ५६ वर्ष, रा. राजोला ता. कुही जि. नागपुर यांच्या घरात घुसुन फिर्यादीच्या मुलीच्या गळयावर व डाव्या हातावर चाकूने वार करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ४५२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतीश पाटील साहेब, पो.स्टे. वेलतूर मो.न. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

### घरफोडी

१) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा शिवराम नगर चणकापूर येथे दिनांक २६/१२/२०२२ चे १३.०० वा. ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. शोभा चंद्रशेखर धुंडे, वय ४६ वर्ष, रा. शिवराम नगर, वार्ड क्र. २ चनकापूर ही दहेगावला मजुरीचे कामाला गेली असता व तिचा मुलगा नामे– कमलेश हा १३.०० वाजता घराला कुलूप लावून लायब्ररी येथे अभ्यासाकरिता गेला असता सायंकाळी १८.०० वाजता फिर्यादी ही आपल्या पतीसोबत घरी येत असताना तिचा मुलगा आला व घराचा दरवाजा उघडा दिसत आहे घराच्या दाराचे कुलूप तुटलेले आहे असे सांगितल्याने घराचे आत जाऊन पाहिले असता आतील रूम मधील लोखंडी आलमारीचा लॉकर उघडा होता व लॉकर मध्ये ठेवलेले १) जुनी सोन्याचे मंगळसूत्र जुने तीन ग्रॅम किंमती अंदाजे १५००/–रू. २) कानातील झुमके सोन्याचे तीन ग्रॅम किंमती अंदाजे १५००/– रू. ३) पाच ग्रॅम सोन्याचे टॉप्स किंमती अंदाजे ३०००/– रुपये ४) साडेतीन ग्रॅम जुने मुखडा सोन्याचे किंमती १८००/– रुपये ५) अडीच ग्रॅमची सोन्याची नथ किंमती अंदाजे ५०००/–रुपये ६) चांदीचा ब्रेसलेट किंमती अंदाजे ५००/– रुपये व नगदी १०,०००/– रुपये असा एकूण २३,३००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने दिवसा दरम्यान घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक राजू भोयर मो. क्र. ७०८३८२९१६५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**